## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९१/२०१८** **दिनांक १३/११/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/११/२०१८ ते १३/११/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/११/२०१८ सकाळी ८:३० पासून १८/११/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ | ११/११ | १२/११ | १३/११ | | १४/११ | १५/११ | १६/११ | १७/११ | १८/११ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३२ | ३४ | ३५ | ३५ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २० | २१ | २२ | २२ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | १ | १ | ४ | १ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६३ | ६६ | ५० | ५३ | ५४ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २९ | ३२ | २६ | २७ | २८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ७ | ९ | ८ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ई.पू. | ई.पू. | पू. | ई.पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३५१५.९ | ३४४२.२ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १४ ते १८ नोव्हेंबर २०१८ पर्यंत कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. दिनांक १४ ते १८ नोव्हेंबर २०१८ पर्यंत आकाश अंशःता मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पूर्व मशागत | • रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करण्याची पूर्वतयारीची करण्यास सुरवात करावी. |
| नागली | कापणी | • तयार झालेल्या नागली पिकाची कणसे सकाळी विळ्याने कापून उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. |
| भुईमुग | पूर्व मशागत | • रब्बी भुईमुग लागवडीसाठी शेताची पूर्वतयारीची करण्यास सुरवात करावी. जमीन खोल नांगरून हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळावे. |
| वाल | रोप | • वाल पिकातील तणांचे नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी निंदनी करावी. |
| आंबा | पालवी | • नवीन लागवडीतील आंबा कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमाभोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावीत. |
| काजू | पालवी | • नवीन लागवडीतील काजू कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमाभोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावीत. |
| नारळ | फळधारणा | • नारळ बागेतील सुकलेल्या झावळ्या, पालापाचोळा गोळा करून बाग स्वच्छ करून ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| सुपारी | -- | • सुपारी बागेतील सुकलेली शिंपुटे, फळे आणि झावळ्या काढून बाग स्वच्छ करावी व आवशक्यतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| कांदा | रोपवाटिका | • कांदा रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | रोपवाटिका | • वांगी व मिरची पिकांची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मिली प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीनंतर लगेच पाणी दयावे.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • उपलब्ध असलेल्या हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करण्यासाठी गवत, फुलावर असताना कापणी करून मुरघास तयार करून साठवण करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**